Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 818 – 822

DOI: 10.5281/zenodo.10280244

Original Research Article

# महात्मा गांधींचे ग्रामोद्योगासंबंधी विचार : एक अभ्यास

प्रा. राम गणपतराव शेवलीकर

लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद, जि. नांदेड ४३१८०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ramshewlikar1982@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजींनी ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेत ग्रामीण उद्योगांच्या पुनरुज्जीवनाला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या मते, खेड्याच्या प्रगतीवरच भारताची प्रगती अवलंबून आहे. खरा भारत हा खेड्यात राहतो. खेड्याच्या प्रगतीत जागतिक अर्थकारण, भ्रष्ट राजकारण व लोकांची मानसिकता अशा अनेक बाबी अडचणी ठरत आहेत. खेड्यातील गुणवत्ता शहरी भागात स्थलांतरित झाल्याने खेड्याचा विकास झाला नाही. खेड्यातील कौशल्याचा यांत्रिकिकरणामुळे ऱ्हास होत आहे. त्यामुळे खेड्यात बेकारी, दारिद्रय, कुपोषण, निकृष्ट आहार यासारखे प्रश्न अनुत्तरित आहेत. आज शेतीला इतर व्यवसायाची जोड न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या दु:खात वाढ झाली आहे. महात्मा गांधी यांना शेतीला ग्राम उद्योगाची जोड मिळावी असे वाटत होते. त्यांनी आपल्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेत ग्रामोद्योगाला अनन्य साधारण महत्व दिले आहे. खेड्यातील दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खेडोपाडी खादी उद्योग व इतर ग्रामीण उद्योग निर्माण करण्याचे विधायक कार्य त्यांनी हाती घेतले होते. गांधीजी म्हणतात की, खेड्यांचा ऱ्हास हा तेथील उद्योग-धंदे व कला-कारागिरी नष्ट झाल्यामुळे होत आहे. त्यामुळे त्यांच्या पुनरुज्जीवनावर लक्ष देणे आवश्यक आहे त्यांनी मोठ्या उद्योगापेक्षा छोट्या ग्रामोद्योगांना अधिक महत्व दिले. ग्रामोद्योगांना चालना देण्यासाठी काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमात ग्रामोद्योगाचा समावेश करण्यात आला होता. ग्रामोद्योगाला चालना देण्यासाठी अखिल भारतीय चरखा संघ, ग्रामोद्योग संघ इ. ची स्थापना करण्यात आली होती. त्या काळी भारतातील शेती व्यवसायाची स्थिती अत्यंत दयनीय होती. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागत होते, शेतीला उद्योगाची जोड नव्हती. ब्रिटिश राजवटीमुळे ऱ्हास पावलेल्या लघु उद्योजक व कारागीरावर उपासमारीची वेळ आली होती. अशावेळी महात्मा गांधींनी शेतीला उद्योगाची जोड देण्याचे विचार मांडले. शेतीला जोड व्यवसाय म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना चरखा हे साधन दिले. त्यामुळे शेतीला कापड व्यवसायाची जोड मिळाली. ग्रामीण उद्योगांचे पुनरुज्जीवन करणे हेच खेड्यातील बेरोजगारी व दारिद्रय कमी करण्याचा खरा मार्ग आहे, अशा निष्कर्षाप्रत गांधीजी आले. अन्नाप्रमाणेच वस्त्र ही मानवाची मूलभूत गरज असल्याने त्यांनी सुतकताईला अधिक महत्व दिले. त्यांनी 'चरख्याला ग्रामीण उद्योगांच्या केंद्र स्थानी मानले व त्याच्या भोवती इतर उद्योगाची गुंफण केली.'[१] एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमधील यंत्राधिष्ठित उद्योजकाच्या स्पर्धेने भारतातील

हस्त कौशल्याच्या व्यवसायाचा ऱ्हास झाला. त्यानंतर ब्रिटिशांचे अनुकरण करून येथील भांडवलदारांनी मोठ्या कापड गिरण्या व कारखान्यांची स्थापना केली. या स्पर्धेत भारतातील कारागीर टिकू शकले नाही. त्यामुळे एकेकाळी मालक असणारे आता मजूर बनले होते. भारतासारख्या लोकसंख्या बहुल देशांनी भांडवलप्रधान उत्पादन तंत्राऐवजी श्रमप्रधान तंत्राचा उपयोग करावा, ग्रामीण उद्योगांच्या वाढीवर भर द्यावा, असे महात्मा गांधीचे मत होते.

**खादी उद्योग आणि विणकाम**

महात्मा गांधीच्या मते, अन्नाप्रमाणेच मानवाला वस्त्राची गरज असते, म्हणून त्यांनी खादी उद्योगाला अधिक प्राधान्य दिले. खादी उद्योगातून शेतीला जोड व्यवसाय मिळून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन दारिद्र्य निर्मूलन होईल. खादी उद्योगातून खेड्यातील लाखो भारतीयांना रोजगार मिळेल, म्हणून गांधीजींनी खादी आणि खादी तयार करण्याच्या सुतकताईला खूपच महत्त्व दिले. ते म्हणतात. खादी ही देशातील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याचा व समतेच्या प्रारंभाची सूचक आहे. "खादी म्हणजे सर्वव्याप्त स्वदेशी मनोवृत्ती जीवनाच्या सर्व गरजा हिंदुस्थानातूनच आणि त्याही खेड्यातील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करून भागवण्याचा कृती निश्चय होय."[२] खादी उद्योगातून खेड्यातील जनतेला रोजगार पुरविला जाईल. त्यांनी खादीला अहिंसेची प्रतिमा मानले होते. तसेच गांधीजी म्हणत "चरखा हा सर्व उद्योगांचा मध्यबिंदु आहे. चरखा हा सूर्य मानला तर अन्य उद्योग हे सूर्यमालेतील सूर्याभोवती फिरणारे गृह ठरतील. माझा पूर्ण विश्वास आहे की, हातमाग व विणकामाच्या पुनरुजजीवनाने भारताच्या आर्थिक आणि नैतिक पुनरुद्धाराला मदत मिळेल. कोट्यावधी लोकांना आपल्या शेतीच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी जोड उद्योगांची साथ हवी."[३] हे ओळखून बापूंनी भारतातील शेतकऱ्यांचे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी खादी उद्योगाला चालना देण्याचे ठरवले. चरख्यातून व सूत कारखान्याच्या उद्योगातून देशातील सर्व लोकांची वस्त्राची गरज देशातच पूर्ण होईल आणि खेड्यात रोजगाराची निर्मिती होईल. महात्मा गांधीच्या मते, अन्नाप्रमाणेच मानवाला वस्त्राची गरज असते, म्हणून त्यांनी खादी उद्योगाला अधिक प्राधान्य दिले. खादी उद्योगातून शेतीला जोड व्यवसाय मिळून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन होईल खादी उद्योगातून खेड्यातील लाखो भारतीयांना रोजगार मिळेल, म्हणून गांधीजींनी खादी आणि खादी तयार करण्याचा चरख्याला खूपच महत्त्व दिले. ते म्हणतात खादी ही देशातील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याचा व समतेच्या प्रारंभाचा सूचक आहे. खादी उद्योगातून खेड्यातील जनतेला रोजगार पुरविला जाईल. गांधीनी खादीला अहिंसेची प्रतिमा मानली होती. तसेच गांधीजी म्हणत माझा पूर्ण विश्वास आहे की, हातमाग व विणकामाच्या पुनरुज्जीवनाने भारताच्या आर्थिक आणि नैतिक पुनरुद्धाराला मदत मिळेल. कोट्यावधी लोकांना आपल्या शेतीच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी जोड उद्योगांची साथ हवी. याचा अर्थ बापूंनी भारतातील शेतकऱ्यांच्या दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी खादी उद्योगाला चालना देण्याचे ठरवले. चरख्यातून, सूत कारखान्याच्या उद्योगातून देशातील सर्वांची वस्त्राची गरज देशातच पूर्ण होईल आणि खेड्यात रोजगाराची निर्मिती होईल. खादी उद्योग भारतात वाढण्याचे कारण म्हणजे १) खादी कपडे तयार करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या चरख्याला भांडवल फारच थोडे लागते. २) चरखा चालवणे हे अत्यंत सोपे असते, कोणीही चरखा चालवू शकतो. ३) चरख्यामुळे शेतकऱ्यांना निश्चितपणे उत्पन्न मिळते. ४) चरख्यामुळे खेड्यातील लोकांना काम मिळून त्यांच्या बेकारीचा प्रश्न सुटण्यास मदत होते. ५) चरख्यामुळे तयार होणाऱ्या खादीला अमर्याद व मोठी बाजारपेठ उपलब्ध असते. ६) शेतकऱ्यांची शेती ही पावसावर अवलंबून आहे त्यामुळे त्यांना बाराही महिने व चोवीस तास चरख्याचा वापर करता येतो. ७) दुष्काळामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला चरख्यामुळे समर्थपणे तोंड देता येते. ८) चरख्यामुळे अनेक जोड धंद्यांना सोयी उपलब्ध होतात. ९) चरख्यामुळे संपत्तीचे समान वाटप होण्यास मदत होते. १०) विदेशी कापड खरेदीसाठी भारताची जी संपत्ती बाहेर जाते ती विणकाम व खादी उद्योगामुळे बचत होते. ११) लोकांमध्ये सहकार्य निर्माण करण्याचे चरखा एक प्रभावी साधन आहे.[४] अशाप्रकारे गांधीजींनी चरख्याचे अनेक फायदे सांगितले. खेड्यातील लाखो लोकांना सार्वत्रिक रोजगार पुरविण्याचे काम चरख्याने निर्माण केले. चरख्यामुळे खेड्यांना पुन्हा चांगले दिवस येतील आणि खेड्यापाड्यातील गरीब-

श्रीमंतां मधील दरी कमी करण्यास मदत होईल. त्यांच्या मते खादी व इतर उद्योगांच्या पुनरुर्धार करून देशाचा विकास करता येईल यातूनच इंग्लंडच्या साम्राज्यवादी, भौतिकवादी संस्कृतीचा बिमोड करता येईल. यासाठी अन्न व वस्त्रात आत्मनिर्भरता प्राप्त होऊन भारताचा आर्थिक विकास होईल. गावाचे पुनरुज्जीवन खादीच्या विकासातून होईल. त्यामुळे गरीबांना शक्ती प्राप्त करून स्वराज्याची निर्मिती होईल. गांधीजींनी कॉंग्रेसला गरीबांच्या विकासावर केंद्रित करण्याचे कार्य केले म्हणून गांधीजी आपल्या ग्रामस्वराज्य या पुस्तकात लिहितात, चरखा आणि कॉंग्रेस एकमेकांना पर्यायवाची शब्द बनले पाहिजेत. चरखा हे स्वराज्याचे प्रतीक आहे. जातीय सामोपचाराचे प्रतीक आहे, त्याला आपण नष्ट करू शकत नाही. त्याप्रमाणे चरखा अहिंसेचेही प्रतीक आहे.[५] गांधीजी म्हणतात जर आपण बुद्धीपूर्वक चरख्याचा उपयोग केला तर खेड्यात पुन्हा जिवंतपणा आणता येईल. लोकांमध्ये असलेली आळशी प्रवृत्ती दूर करण्याचे खादी एक मोठे साधन आहे. जनतेला स्वराज्य प्राप्त करून देण्याची शक्ती खादी उद्योगांमध्ये आहे. याशिवाय इतर गोष्टींमध्ये स्वावलंबी बनलो तर सर्व गावे स्वावलंबी होतील. स्वतंत्रता व अहिंसेचे प्रतीक असलेल्या चरखा जेव्हा भारताच्या घरा-घरात पोहोचेल तेव्हाच खरा सण साजरा होईल. जेव्हा भारतातील सर्व जनता खादीचे कपडे तयार करतील, तेव्हा आपल्या गावाचे अभूतपूर्व कधी नव्हे तेवढी प्रगती होईल. आज देशात देशी व विदेशी 300 कोटी रुपये कपडा उपयोगात आणला जातो. 300 कोटी रूपयांचा कपडा भारतातील खेड्यात निर्माण झाला तर विचार करा भारताला किती संपत्ती मिळेल. खादी उद्योग हा सोन्याच्या शिंक्कयांची टाकसाळीच आहे. आज आपली जनता प्रचंड दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकली आहे आणि त्यांच्या डोळ्यात आशेची कोणतेही दृष्टी आढळत नाही, पण खादी उद्योगातून एक नवी दृष्टी निर्माण होईल. आपल्याला लाज झाकण्यासाठी व देशाला उपासमारीतून बाहेर काढण्यासाठी एकच उपाय आहे तो म्हणजे आपल्या गरजे पुरते अन्नधान्य आणि कपड्याची निर्मिती स्वत: करणे होय.[५] अशाप्रकारे गांधीनी केवळ आर्थिकदृष्ट्या चरख्याचे महत्त्व सांगितले असे नाही तर नैतिक व राजकीयदृष्ट्या ही चरखा अत्यंत महत्त्वाचा होता. खादी व चरख्यातून भारताला स्वराज्य मिळविता येईल. गावांना स्वराज्य प्राप्त होईल. बेकारी व दारिद्य निर्मूलन तर होईल. देशातील विषमता ही नष्ट होईल असा गांधीजींचा दृढ विश्वास होता. गांधीजींनी खादी उद्योगाची भरभराट यासाठी पुढील उपाययोजना सांगितल्या 1) प्राथमिक व माध्यमिक शाळेत चरख्यावर सुतकताईला हा विषय आवश्यक म्हणून ठेवावा.2) ज्या भागांमध्ये कापसाचे उत्पादन होत नाही, तेथे कापसाची लागवड करावी. 3) बहुउद्देशीय सहकारी संस्था मार्फत विणकामाचे संघटन करावे. शिक्षण सहकार, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि ग्राम पंचायती या खात्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी सूत कताईच्या परीक्षेत पास झालेच पाहिजे असे बंधन असावे. 4) ज्या भागात हातमागावरील कापड मुबलक उपलब्ध असेल त्या भागात कापड गिरण्यांतून यंत्रावर तयार झालेले कापड वापरण्यास बंदी घालावी.5) सर्व सरकारी कारखान्यातील कर्मचाऱ्यांना हातमागावर तयार झालेले कापड वापरावे. 6) जुन्या कापड गिरण्यांना त्यांची उत्पादन शक्ती वाढविण्यास परवानगी देऊ नये व नवीन कापड गिरण्या सुरू करू नयेत. 7) परदेशातून कापड आयात करण्यास बंदी घालावी. [६] ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व्हावी यासाठी गांधीजींनी खादी उद्योगाशिवाय इतर ग्रामोद्योग ही महत्त्वाची मानले आहेत. त्यांच्या मते, देशात आज मोठ्या उद्योगाची प्रगती होत आहे पण लघु व देशी उद्योगांचा विकास मात्र होत नाही. वस्तुत असे देशी लघु व कठोर उद्योग रोजगार निर्मिती व ग्रामस्वराज्यासाठी अधिक उपयुक्त आहेत. म्हणूनच ते म्हणतात, 'गृह उद्योगांना प्रोत्साहन आणि संजीवन देण्यातच खरी देश भक्ती आहे, यात काही शंका नाही, करोडो मूक लोकांना मदत करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. यातूनच लोकांच्या सर्जनशक्ती व कला कारागिरीचा विकासाचा मार्ग मोकळा होईल. देशातील शेकडो बेकार युवकांना ग्राम उद्योगातून उपयोगी व्यवसायाची साधने मिळतील. आज वाया जाणाऱ्या युवा शक्तीचा सदुपयोग होईल. जे लोक गरिबीने त्रस्त आहेत, त्यांनी या उद्योगांपैकी एखादा उद्योग सुरू करून उत्पन्नात वाढ करावी.'[७] देशातील मोठ्या उद्योगांना त्यांचा विरोध नव्हता, परंतु खऱ्या अर्थाने लघुउद्योगातून सर्वांचा विशेषत: ग्रामीण भागाचा विकास होईल, अशी त्यांची धारणा होती. म्हणून ते म्हणतात लघुउद्योग मोठ्या उद्योगांना पूरक म्हणून कार्य करतील. गावातील उद्योगांचा विकासाकडे दुर्लक्ष करून आपण फार मोठी अक्षम्य चूक केली आहे,

कारण गावातील कारागीर बेकार तरुणांना या उद्योगातून रोजगार मिळत होता. ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास झाला आणि विदेशी उद्योगाची भरभराट झाली. म्हणून देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी गावातील कारागीरांना मदत करणे गरजेचे आहे. कारण विदेशी उद्योगांना स्पर्धा करण्यासाठी लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आपल्या देशात खादी उद्योगाशिवाय इतर देशी उद्योगात संशोधन झाले नाही, असे गांधीजी म्हणतात. विदेशी वस्तू ऐवजी आपण स्वदेशातील गावातील लघु व कुटीर उद्योगातून निर्मित वस्तूंची दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी उपयोग करावा. वस्तूतः विदेशी मोठ्या कारखान्यातून आलेल्या वस्तूपेक्षा स्वदेशातील लघु उद्योगातून निर्माण केलेल्या वस्तू दर्जेदार असतात. म्हणून खेड्यातील गावकऱ्यांच्या निद्रिस्त कारागिरीला जागृत करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अस्तित्वासाठी भारतातील खेड्यांच्या पुनर्वसनातून अस्पृश्यता निर्मूलन होईल आणि धार्मिक भेदभाव नष्ट होऊन एकता निर्माण होईल. त्यासाठी शुद्ध अंत:करणाने आपल्याला खेड्याकडे जावे लागेल. "दैनंदिन जीवनात खेड्यात तयार होणाऱ्या वस्तूंचा उपयोग केला तर लाखो रुपये ग्रामीण भागातील गरीबांना मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. भारतातील शेतकरी दारिद्र्यात व कर्जाच्या सापळयात अडकला असून निराशामय परिस्थितीत जीवन कुंठित आहे. उपासमारीतून त्यांचा मृत्यू ओढवत आहे त्यांना पुनरुज्जीवन देण्यासाठी खेड्यातील उद्योगांना चालना द्यावी. ग्रामोद्योगाचा नाश झाला तर भारतातील सात लाख खेड्यांचा सर्वनाश होईल,"[८] असे गांधीजी म्हणतात. त्यांच्या मते, मनुष्यबळाची जेव्हा कमतरता असते तेव्हा यंत्र शक्तीचा वापर केला पाहिजे, परंतु भारतासारख्या लोकसंख्या बहुल राष्ट्रात यांत्रिकिकरणातून हानीच होईल. खादी हा ग्रामोद्योगातील अत्यंत महत्त्वाचा उद्योग आहे, अन्य उद्योगात गूळ तयार करणे, टोपल्या तयार करणे, दोरखंड तयार करणे, घाणीतून तेल काढणे, पीठ दळणे, काड्यांच्या पेट्या बनवणे, हाताने कागद बनवणे, कातडी कमावणे, खेळणी बनवणे, चटया बनवणे, लाड गूळ बनवणे मध काढणे, कपडे शिवणे, दुग्ध व्यवसाय, मधु मक्षिका पालन करणे, पेनची शाई बनवणे इत्यादी. ग्रामोद्योग खेड्यात सुरू करावेत. अशा ग्रामोद्योगाचा विकासाशिवाय गावाची आर्थिक रचना पूर्ण होऊ शकत नाही, गाव स्वयंपूर्ण बनू शकत नाही. गांधीजी म्हणतात, ' हिंदुस्थानातील तयार झालेल्या वस्तूच आपण वापराव्या. जर घरगुती मागणी वाढली तर खेडी गावातील बहुतेक गरजा भागू शकतील, याबद्दल शंका नाही. आपली मनोवृत्ती ग्रामीण झाली पाहिजे. म्हणजे आपणास पाश्चात्यांच्या अनुकरणाचे किंवा तेथील यंत्रांनी बनवलेल्या वस्तूंचे आकर्षण वाटणार नाही आणि आळसाचे नाव निशाणीही राहणार नाही.'[९] हे उद्योग खेड्यात सुरू होऊन तेथील लोकांचा निरूद्योगीपणा नष्ट होईल व त्यांचा वेळ सत्कारणी लागेल. असे उद्योग थोड्या मदतीने गावात सुरू करता येतील. या उद्योगासाठी लागणारे ज्ञान व कसब खेड्यातील लोकांना परंपरेने मिळालेले आहे. आता या वस्तू यंत्रावर बनवू लागल्याने या वस्तू हाताने तयार करण्याची कसब व ज्ञान नष्ट होत आहे. ग्राम उद्योगाला पुन्हा सुरू केल्यास लयाला जात असलेले ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत होईल. शिवाय ग्राम उद्योगामुळे आर्थिक संपत्तीचे विकेंद्रीकरण होईल. मोठ्या कारखान्यातून कामगारांची पिळवणूक होते, उत्पन्नाच्या वाटणीतील विषमता वाढत जाते. परंतु लघु उद्योगातून संपत्तीच्या वितरणात समानता येईल. खेड्यातील गरीब कुटुंबाला उत्पन्नाचे साधने लघु व कुटीर उद्योगातून निर्माण होतील. इंग्रजांची शिक्षण पद्धती कारकुनी शिक्षण देणारी होती. खऱ्या अर्थाने उत्पादकता व कौशल्यात वाढवणारी शिक्षण पद्धती असणे गरजेचे होते. याची गरज ओळखून गांधीजींनी लघु व कुठून उद्योगाचे शिक्षण प्रशिक्षण देणारी मुल उद्योगी शिक्षण पद्धतीचा अवलंब केला आणि वर्धा शिक्षण पद्धती सुरू केली ब्रिटिशांनी तयार केलेल्या यांत्रिक वस्तूपेक्षा खेड्यात ग्राम उद्योगातून तयार झालेल्या वस्तू अधिक उपयुक्त आहेत यांत्रिक उद्योगातून तयार झालेल्या साखरेपेक्षा खेड्यातील गुऱ्हाळयातून तयार झालेला गूळ आरोग्यासाठी चांगला असतो. घाणीतून तयार झालेले तेलाऐवजी रिफाइंडच्या नावाखाली रसायनयुक्त तेल आपण खातो. सत्वयुक्त सातसडीचे कडधान्य आपण खात नाही, तर यंत्रावर पॉलिश केलेले व सत्व निघून गेलेले कडधान्य आपण खातो विदेशी कपडा ऐवजी खादी कापड आपण वापरायला हवे. थोडक्यात हे विविध उद्योग रोजगार निर्मिती, स्वराज्य, स्वावलंबन निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आवश्यक असून संपत्तीचे असमान वितरण, आळशीवृत्ती यामुळे खेड्यांचा होत असलेला ऱ्हास रोखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

म्हणून प्रत्येक खेड्यात ग्राम उद्योग निर्माण झाले पाहिजे, वाढले पाहिजेत, असे गांधीजींनी आग्रहाने प्रतिपादन केले. “हमें अपनी रोजमर्रा की आवश्यकता गाव की चीज गावो की बनी चिजों से ही पुरी करनी चाहिए, और जहाँ यह मालूम हो की अमुक चीजें गावों मे मिलती ही नही वहाँ हमे यह देखना चाहिए की ऊन चिजों को थोडे परिश्रम और संघटन से बनाकर गाववाले उनसे कुछ मुनाफा उठा सकते है या नही।”[१०] एवढेच नाही तर गावकऱ्यांना ग्रामोद्योगाचा वस्तू निर्माण करण्यासाठी मदतही केली पाहिजे, त्यांना प्रेरणा दिली पाहिजे.

**सारांश**

ग्राम उद्योगासंबंधी महात्मा गांधीजींनी मांडलेले विचार आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही आवश्यक ठरतात. कारण आज जागतिकीकरणामुळे जग हे एक वैश्विक खेडे बनलेले असताना दुसरीकडे मोठमोठ्या विदेशी उत्पादन संस्था निर्माण होऊन देशामधील लघु व कुटीर उद्योगांना आव्हान निर्माण करत आहे. परिणामी ग्रामीण भागात बेरोजगारी, छुपी बेकारी, दारिद्र्य व आर्थिक विषमता यासारख्या समस्या आजही अस्तित्वात आहेत म्हणून भारताच्या ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी महात्मा गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागात गुंतवणूक वाढवून मोठ्या प्रमाणामध्ये उद्योगांची निर्मिती होणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योगासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करून देऊन उद्योगांची निर्मिती केली तेंव्हाच आपण खऱ्या गांधींजींच्या स्वप्नातील भारत घडवू शकू.

**संदर्भ सूची**


१. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १५२

२. पंडित नलिनी – गांधी – ग्रंथाली प्रकाशन, दादर मुंबई ४०००२८, पृ. क्र. १७२

३. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १३३

४. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १३५

५. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १४२

६. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १४६

७. ठक्कर के. एच.- अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास- विद्या प्रकाशन, नागपूर पृ. क्र. ३३४

८. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १४८

९. गांधी मो. क. – ग्रामस्वराज्य – नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ पृ. क्र. १५१

१०. गांधी मो. क. – मेरे सपनों का भारत – राजपाल अँड सन्स कश्मिरी गेट, दिल्ली-६ पृ. क्र. ८९